**नियमित दिवाणी दावा क्र. १५/२०१४**

**बाजीराव विरुध्द वसंत**

**CNR:MHSN14-000052-2014**

## नि.क्र. ८७ वरील आदेश

१. वादी यांनी त्यांचे विरुध्द प्रतिवादी व साक्षीदार यांचा उलटतपास नाही असा झालेला आदेश रद्द होवून उलटतपास घेणेस परवानगी मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे.

२. वादीतर्फे असे कथन केले आहे की, सदर कामी मागील तारखांना वादी यांची आई आजारी असलेने व वयोवृध्द असलेमुळे वादी हे वेळोवेळी वकीलांना भेटू शकले नव्हते. सदर कामी प्रतिवादी व साक्षीदारांचेबाबत दिनांक ३१/१०/२०२३ व २२/११/२०२३ रोजी उलटतपास नाही असा आदेश पारीत झालेला आहे. सदरकामी नैसर्गिक न्यायाचे दृष्टीने वादींना उलटतपास घेणेची संधी मिळणे गरजेचे आहे व त्यामुळे न्यायदानास मदतच होणार आहे. त्यामुळे वादींविरुध्दचा उलटतपास नाही असा आदेश रद्द करुन प्रतिवादी व साक्षीदाराचा उलटतपास घेणेस परवानगी मिळणेची विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादींतर्फे सदर अर्जावरच म्हणणे दिले आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज खोटा व लबाडीचा असून अर्जास दिलेले कारण खोटे व चुकीचे आहे. वादी यांनी मे. कोर्टात त्याबाबत मुदत अर्ज देणे आवश्यक होते. वादी यांचा जाणीवपूर्वक दावा प्रलंबीत ठेवण्याचा उद्देश निदर्शनास येतो. वादी यांना या दाव्यात कोणतेही स्वारस्य नाही. केवळ प्रतिवादीस त्रास देण्याचे उद्योग वादी करत आहे. त्यामुळे वादीचा अर्ज फेटाळणे योग्य होईल. वादी आजच उलटतपास घेणार असतील तर र.रु. १०,०००/- कॉस्टवर अर्ज मंजूर करणेची विनंती केलेली आहे.

४. वादींचा अर्ज व त्यावर प्रतिवादींतर्फे दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रतिवादी यांनी दिनांक २५/०९/२०२३ रोजी नि.क्र. ७७ अन्वये त्यांचे स्वत:चे सरतपासाचे ॲफिडेव्हीट दाखल केले आहे. त्यानंतर दिनांक ३१/१०/२०२३ रोजी प्रतिवादींचा पुढील सरतपास घेतलेला आहे. परंतू वादी व त्यांचे विधीज्ञ हजर नसलेने तसेच

मुदतीचा कोणताही अर्ज नसल्याने वादीविरुध्द प्रतिवादींचा उलटतपास नाही असा आदेश दिनांक ३१/१०/२०२३ रोजी पारीत करणेत आलेला आहे. त्यानंतर दिनांक ०६/११/२०२३ रोजी प्रतिवादीतर्फे साक्षीदार श्रीपती लखू मोडे यांचे साक्षीपुराव्याचे ॲफिडेव्हीट दाखल केले आहे. त्यानंतर पुन्हा वादी व त्यांचे विधीज्ञ हजर नसलेने, मुदतीचा कोणताही अर्ज नसल्याने, प्रकरण जुने व साक्षीदार वयस्कर असलेने संधी देवूनही साक्षीदाराचा उलटतपास घेतला नाही. त्यामुळे वादीविरुध्द प्रतिवादी साक्षीदाराचा उलटतपास नाही असा आदेश दिनांक २२/११/२०२३ रोजी पारीत करणेत आलेला आहे.

५. प्रस्तुतचा दावा निरंतर व मँडेटरी मनाईसाठी दाखल केलेला आहे. दावा मिळकतीमध्ये वादीचा देखील हक्क हितसंबंध आहे. त्यामुळे त्यांना प्रतिवादी व त्यांचेतर्फे साक्षीदार यांचा उलटतपास घेण्याची संधी दिल्यास न्यायदानासाठी त्याचा उपयोग होणार आहे. त्यामुळे उभय पक्षांपैकी कोणाचेही नुकसान होणार नाही. दावा गुणदोषांवर चालवून निकाली करणेस मदत होणार आहे. प्रस्तुतचा दावा हा नऊ वर्षे जुना आहे. वादींतर्फे प्रतिवादी व साक्षीदार यांचा उलटतपास घेणेकरिता झालेल्या विलंबाची भरपाई म्हणून वादींनी प्रतिवादींना र.रु. ३००/- कॉस्ट देवून अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज नि.क्र. ८७ वादी यांनी पुढील तारखेस प्रतिवादींना र.रु. ३००/- कॉस्ट म्हणून देण्याच्या अटींवर मंजूर करण्यात येतो.

२. कॉस्ट रक्कम दिलेनंतर वादी यांनी विना मुदत प्रतिवादी व साक्षीदार यांचा उलटतपास घ्यावा.

३. वादी यांनी पुढील तारखेस पुर्तता न केल्यास सदरचा आदेश रद्द समजण्यात यावा.

सही/–

शिराळा (**व्ही. ए. देसाई**)

दिनांक ०९/०१/२०२४ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शिराळा.

# **C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | V. S. Patil |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 09/01/2024 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 09/01/2024 |
| Judgment uploaded on | : | 10/01/2024 |